वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, अमरावती यांचे अधिपत्याखालील एकूण ६ वनक्षेत्रपाल पदनामास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एफडीएम २०१९/प्र.क्र.२५/फ-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २३ एप्रिल, २०१९

संदर्भ :- १) वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक-मकोनि-१०००/प्र.क्र.४४/०५,कोषा-प्र.५ दि. ०४.०१.२००६.
२) महसूल व वन विभाग,शासन निर्णय, क्र.एफएसटी-०५/१८/प्र.क्र.२७९/फ-४, दि.३०.०६.२०१८.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-२(१)/असं/प्र.क्र.१९/८७७/२०१८-१९, दि.२८.०२.२०१९
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-२(१)/असं/प्र.क्र.१९/०७/२०१८-१९, दि.०३.०४.२०१९

प्रस्तावना -

शासनाच्या वन विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयातील कर्मचाऱ्यांची वेतन व भत्यांची देयके फेब्रुवारी-२००६ पासून इतर विभागाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच कोषागारातून पारित करण्याबाबत वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.०४.०१.२००६ च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ खंड-१ मधील नियम १३ नुसार व नियम १५(३) नुसार विभागातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची यादी महालेखापाल कार्यालयाकडे पाठविण्यात येते. यानुसार वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयानुसार विभागातील आहरण व संवितरण आधिकाऱ्यांच्या याद्या प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

२. त्याअनुषंगाने प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर यांनी त्यांच्या संदर्भ क्र.३ व ४ येथील दि.२८.०२.२०१९ व दि.०३.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित केल्यानूसार वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, अमरावती यांच्या अधिपत्याखालील एकूण ६ वनक्षेत्रपाल पदनामास आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. त्याअनुषंगाने सदरहू पदनामास "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर यांच्या कार्यालयाने संदर्भ क्र.३ व ४ येथील दि.२८.०२.२०१९ व दि.०३.०४.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, अमरावती यांच्या अधिपत्याखालील खालील एकूण ६ पदांना वित्त विभागाच्या दि.०४.०१.२००६ रोजीच्या शासन निर्णयानूसार त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्याची देयके पारीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे :-

अ. क्र.	**वनवृत्त कार्यालय**	**आहरण व संवितरण अधिकारी घोषित करावयाचे पदनाम**	**मुख्यालय ठिकाण**	**जवळचे उपकोषागार कार्यालय व सांकेतांक क्र.**
१	वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, अमरावती	वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण, दर्यापूर	दर्यापूर	६१०९ उपकोषागार दर्यापूर
२		वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण, चिखलदरा स्थित परतवाडा	परतवाडा	६१०२ उपकोषागार अचलपूर
३		वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण, धामणगाव रेल्वे	धामणगाव रेल्वे	६१०३ उपकोषागार धामणगाव रेल्वे
४		वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण, नांदूरा	नांदूरा	६३१० उपकोषागार नांदूरा
५		वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण, नेर	नेर	६४१४ उपकोषागार नेर
६		वनक्षेत्रपाल, सामाजिक वनीकरण, बाभुळगांव	बाभुळगांव	६४०८ उपकोषागार बाभुळगांव

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१९०४२३१६४८०४०६१९ असा आहे.हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2019.04.23 16:55:07 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव
महसूल व वन विभाग

प्रति -

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), नागपूर.
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजीक वनीकरण), पुणे.
४. मुख्य वनसंरक्षक (प्रा.),अमरावती.
५. वनसंरक्षक, सामाजीक वनीकरण, अमरावती.

६. महालेखापाल (लेखा परीक्षा) / (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर.
(त्यांना विनंती करण्यात येते की, महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ खंड-१ मधील नियम १५(२) व १५ (३) नुसार उपरोक्त अधिकाऱ्यास प्राधिकृत करण्याची पुढील कार्यवाही करण्यात करावी.)
७. संचालक, लेखा व कोषागार, संचालनालय, मुंबई.
८. वरीष्ठ लेखा कोषागार अधिकारी, नागपूर / मुंबई.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा.
१०.उप कोषागार अधिकारी, दर्यापूर/अचलपूर/धामणगांव रेल्वे/नांदुरा/नेर/बाभुळगांव
११.सहसंचालक, (तांत्रिक) लेखा व कोषागार, मुंबई.
१२. वित्त विभाग, कार्यासन कोषा. प्र-५, मंत्रालय, मुंबई.
१३. निवड नस्ती (फ-२), महसूल व वन विभाग.